महाविद्यालयात वाणिज्य विद्यार्थ्यांचा COMBO-2018 कार्यक्रम संपन्न

## महाविद्यालयीन जिवनातील संपर्क अतुट संपर्क

– प्राचार्य अरविंद चौधरी

महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा एकमएकांशी परिचय असणे आवश्यक असते. झालेला परिचय जिवनात अतुट नाते निर्माण करते, COMBO-2018 या उपक्रमाद्धारे महाविद्यालयात चांगले वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी यांनी शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये आयिजित वाणिज्य विद्याशाखेच्या COMBO-2018 कार्यक्रमाचे उदघाटन करतांना व्यक्त केले.या प्रसंगी प्रमुख अथिथी उपप्राचार्य डी.एस. पाटील,डॉ.एस.एस.काठोके, डॉ.महाले, ड.व्ही.पी.चौधरी, प्रा.हेमलता कोटेचा, प्रा. उपस्थित होते.

कार्यक्रमाचे पुर्ण नियोजन स्वत: विद्यार्थ्यानी केले होते कार्यक्रमात विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचा समावेश होता व कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी एकत्रित सहभोजनाचा लाभ घेतला.




